RNI MAHMAR
36829-2010


ISSN - 2229-4929

**Peer Reviewed**

# Akshar Wangmay

International Research Journal

**UGC-CARE LISTED**



***RETHINKING MAHATMA GANDHI IN PRESENT CONTEXT***

February 2020

Executive Editor : Dr. Kiran Save

Co-Editor : Dr. Tanaji Pol
Prof. Anagha Padhye Deshmukh

Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

# Index


| अ.क्र. | पेपरचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ट क्र. |
|---|---|---|---|
| १ | महात्मा गांधीजींच्या धर्मविषयक विचारांची प्रस्तुतता | श्री. संतोष बुधाजी भावार्थे | १.५ |
| २ | प्रचलित संदर्भात गांधी विचारांचे महत्व | डॉ. किरण जयदेव सावे | ६.१११ |
| ३ | गांधीजी आणि श्रीमद्‌भगवद्‌गीता | डॉ. सचिन खोकले | १२.१४ |
| ४ | अहिंसातत्वज्ञानाचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास | प्रा. विनोद संभाजी सोनवणे | १५.२१ |
| ५ | आज गरज महात्मा गांधीजीच्या अर्थकारणाची | डॉ. हनुमंत कुरकुटे | २२.२८ |
| ६ | महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचारांची समर्पकता | प्रा. धनेश मधुकर हरड | २९.३४ |
| ७ | कृषी विकासात महात्मा गांधीजीच्या विचारांचे योगदान | प्रा. कांतीलाल शंकर पाटील | ३५.३९ |
| ८ | महात्मा गांधी यांच्या सर्वधर्मसमभाव विचारांची प्रांसंगिकता | डॉ. माधव नरहरी कांबळे | ४०.४४ |
| ९ | महात्मा गांधी आदर्श ग्राम संकल्पना | प्रा.प्रकाश विष्णू घरत | ४५.४८ |
| १० | २१ व्या शतकात महात्मा गांधीजीच्या 'सत्याग्रह' तत्वज्ञानाचे महत्व | प्रा. प्रेरणा राऊत | ४९.५२ |
| ११ | गांधी आंबेडकर महासमन्वय : काळाची गरज | डॉ. राहुल हांडें | ५३.५६ |
| १२ | गांधीजींचे स्त्री विचार | प्रा. रामदास येडे | ५७.५९ |
| १३ | महात्मा गांधीजीच्या अहिंसा तत्वाचा प्रभाव | प्रा. रोहीत गायकवाड | ६०.६३ |
| १४ | महात्मा गांधीजीच्या विचारांचा शिक्षणमहर्षी कर्मवीर भाउराव पाटील यांच्या कार्यावर पडलेला प्रभाव: एक चिंतन | प्रा. सुनीलदत्त गोडसे | ६४.६६ |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | महात्मा गांधीजीची आदर्श ग्रामाची संकल्पना | डॉ. प्रमोद रामेश्वर चव्हाण | ६७.६९ |
| १६ | गांधीवादाचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ. नाना झगडे, | ७०.८१ |
| १७ | 'सद्य परिस्थितीत महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता' | प्रा. डॉ. वसंत आबासाहेब खरात, | ८२.८७ |
| १८ | महात्मा गांधीजींच्या स्वराज्य संकल्पनेचे एक साधन–सहकार मार्गदर्शक | डॉ. अनिल पाटील<br>योगिनी जयवंत पाटील | ८८.९३ |
| १९ | ''सिनेमा आणि गांधी'' | शशिकांत एस माघाडे | ९४.९९ |
| २० | सिनेमातील गांधी | प्रा. सुजाता बळवंत शिरोडे | १००.१०४ |
| २१ | 'मराठी साहित्यातील गांधीवाद' | प्रा. यादव धोंडूजी मोरे | १०५.१०९ |
| २२ | महात्मा गांधीजींची सत्याग्रह संकल्पना | प्रा. वितेश भारत निकते | ११०.११२ |
| २३ | महात्मा गांधीजींचे ग्रामीण विकासासंबंधीचे विचार | प्रा. डॉ. जे. के. पाटील | ११३.११९ |
| २४ | ''गांधीजीके ट्रस्टीशिप सिद्धांत का अन्वयार्थ'' | श्री. अमन बगाडे | १२०.१२४ |
| २५ | महात्मा गांधीजीकी स्वदेशी विचारधारा | प्रा. दिप्ती हरेश म्हात्रे | १२५.१२७ |
| २६ | २१वीं सदी में गांधीवाद की उपयोगिता | डॉ. संगीता ठाकुर | १२८.१३१ |
| २७ | महात्मा गांधी – राष्ट्रीय नेता | प्रा. डॉ. शेडगे विजय सोपानराव | १३२.१३७ |
| २८ | ग्रामगीता व गांधीविचार | डॉ. शर्मिला वीरकर | १३८.१४५ |
| २९ | महात्मा गांधी यांचे अस्पृश्यताविषयक विचार | डॉ. सखाराम डाखोरे | १४६.१५२ |
| ३० | महात्मा गांधी आणि धर्म | डॉ. विन्सेन्ट कैतान डिमेलो | १५३.१६२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | नाशिक शहरातील मॅनॅजमेन्टच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून महात्मा गांधींच्या शिक्षणाबद्दलच्या विचारांची कालानुरूपता | डॉ. स्मिता कचोळे | १६३.१७२ |
| ३२ | महात्मा गांधी की आदर्श ग्राम संकल्पना | प्रा. प्रकाश विठ्ठल सोनवणे | १७३.१७६ |
| ३३ | महात्मा गांधीच्या विश्वस्त संकल्पनेचे विश्लेषण | डॉ. ग्यानदेव उपाडे | १७७.१८२ |
| ३४ | महात्मा गांधी यांची मोक्ष संकल्पना | डॉ. मुबीन शेख | १८३.१८५ |
| ३५ | गांधी तत्वज्ञानातील स्त्री स्वातंत्र्य: एक तात्विक अभ्यास | प्रा. मनोज उत्तमराव पाटील | १८६.१८९ |
| ३६ | पर्यावरणीय नीतिशास्त्र आणि गांधीवादी दृष्टीकोण | प्रा. अनघा पाध्ये–देशमुख | १९०.१९६ |
| ३७ | गांधी ते महात्मा गांधी : गांधीच्या जडणघडणीत ग्रंथाचा प्रभाव | प्रा. डॉ. शीला गोडबोले – पाईकराव | १९८.२०३ |
| ३८ | गांधीजी का ग्राम स्वराज चिन्तन वर्तमान परिप्रेक्ष्य में..... | प्रो. डॉ. लोकेश जैन | २०४.२१८ |
| ३९ | महात्मा गांधींवरील पाश्चात्य विचारवंतांचा प्रभाव: लिओ टॉलस्टॉय, जॉन रस्किन आणि हेन्री डेविड थोरो | डॉ. तानाजी पोळ | २१९.२२३ |
| ४० | हिन्दी नाट्य–साहित्य में अभिव्यक्त गांधीवाद | प्रा. डॉ. प्रकाश कृष्णदेव धुमाल | २२४.२३२ |
| ४१ | गांधीवाद का हिन्दी पद्य (कविता) पर प्रभाव | प्रा. डॉ. सुनिलदत्त एस. गवरे | २३३.२३९ |
| ४२ | गांधी विचारांची विश्वात्मकता | श्री. जयवंत प्रभाकर बोधले | २४०.२४३ |
| ४३ | स्वदेशी : अहिंसक जीवनदृष्टी | प्रा. शितल रुद्रमुनी येरुळे | २४४.२४७ |
| ४४ | महात्मा गाँधी – एक युग पुरुष | प्रो. अंजना विजन | २४८.२५२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४५ | महात्मा गांधी: लोकशाही हा जीवनमार्ग | ऋतुजा राऊत | २५३.२५७ |
| ४६ | गांधीजींचे पर्यावरणवादी विचार | सोनाली महादेव पवार | २५८.२६७ |
| ४७ | गांधीजी आणि पर्यावरण | मनिषा नागुराव कामजी<br>ऐश्वरी शिवाजी खामकर | २६८.२७१ |
| ४८ | पर्यावरण विचार आणि गांधी | आर्यन एनेश नेरुरकर | २७२.२७८ |
| ४९ | गांधी ते महात्मा गांधींचा प्रवास | तनिका कल्याणकर | २७९.२८४ |
| ५० | गाँधी जी के टिप्पणी और विचार | फिरोज अलिम अली | २८५.२९० |
| ५१ | महात्मा गांधींचे आर्थिक विचार | प्रा. कु. सोनाली सुरेश पेकम | २९१.२९३ |
| ५२ | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार – काळाची गरज | डॉ. बी. एच. दामजी<br>डॉ. ए. व्ही. नामा | २९४.३०० |
| ५३ | महात्मा गांधी यांच्या दृष्टीकोनातून महिला सक्षमीकरण | डॉ. रमिला गायकवाड | ३०१.३०७ |
| ५४ | महात्मा गांधीच्या अहिंसा तत्त्वाची सद्यकालीन प्रासंगिकता | प्रा. धनराज सुभाष हाडुळे | ३०८.३१४ |
| ५५ | महात्मा गांधीजींची धर्म स्वातंत्र्याची संकल्पना | डॉ. बाळासाहेब मुळीक | ३१५.३२३ |
| ५६ | गांधीवाद आणि मराठी कविता | प्रा. विवेक वसंत कुडू | ३२४.३२९ |
| ५७ | २१ व्या शतकात 'सर्वोदय' विचारसरणीचे महत्त्व | प्रा. संध्या देवदत्त शिरोडकर | ३३०.३३४ |

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

# महात्मा गांधीजीच्या अहिंसा तत्त्वाचा प्रभाव

**रोहित सुधाकर गायकवाड**
सोनोपंत दांडेकर कला, वा. श्री. आपटे वाणिज्य
वएम. एच. मेहता विज्ञान महाविद्यालय,
पालघर.

**घोषवारा (Abstract):**

आजच्या आधुनिक जगात बहुतांश राष्ट्रांचा विश्वास दंड शक्तीवर आहे. त्यामुळे क्षेपणास्त्रे, आण्विक चाचण्या, महाभयंकर शस्त्रास्त्रे यावर भर देऊन सत्ता प्राप्तीचा मार्ग स्वीकारत आहेत. यामुळे जागतिक शांतता नष्ट होऊन प्रथम व द्वितीय महायुद्धाची पुनरावृत्ती होण्याची भिती व्यक्त केली जाते आहेण् भूतकाळातील मानव व वित्तहानीचा वेध घेतल्यानंतर सर्वच राष्ट्रांना आज जागतिक शांतता हवी आहे. 'सत्य' व 'अहिंसा' हे दोन तत्त्व आत्म्याचे गुण आहेत अहिंसेच्या मार्गानेच सत्यापर्यंत पोहोचता येते. महात्मा गांधींनी आपल्या संपूर्ण जीवनात अहिंसा, तत्त्वाची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. महात्मा गांधीजींनी अहिंसा तत्त्वाचे प्रयोग केवळ भारतातच केले नाहीत तर भारताबाहेरही केले. त्यांच्या अहिंसा तत्त्वाचा परिणाम इतर राष्ट्रांवरही पडला. यातून गांधीजींनी जागतिक संघर्ष व 'हिंसा' निवारण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. महात्मा गांधींना अहिंसा संबंधी विचाराचे शिक्षण बायबल सारख्या महान ग्रंथातून मिळाले. त्यातील यशू खिस्ताचे पुढील वाक्य त्यांच्या मनावर बिंबले, ते वाक्य असे देवा त्यांना क्षमा कर कारण ते काय करतात ह्याची त्यांना जाणीव नाही.' तर टॉलस्टॉयच्या 'The kingdom of God is within you'ह्या ग्रंथाने त्यांच्या अहिंसेच्या विचाराला दृढता आणून दिली. आणि या दोन्ही ग्रंथाच्या प्रभावाने गांधीजीं भविष्यात अहिंसेचे पुजारी बनले.

अहिंसा या तत्त्वानुसार संबध मानवाने आचरण केले तर मानवी कल्याण, प्रगती, आणि ईश्वर प्राप्ती होते असे स्वयं प्रभू ईसाने म्हटले आहे. या प्राप्तीसाठी त्यानी मनुष्याला तीन आदेश सांगितले १) शत्रूवर प्रेम करा २) शेजाऱ्यावर प्रेम करा ३) परंस्परावर प्रेम करा. जसे मी तुमच्यावर केले. प्रभू ईसाच्या या वाक्यांचा प्रभाव गांधीजींवर पडला होता. भारतात सर्व प्रथम खऱ्या अर्थाने महात्मा गौतम बुद्ध व वर्धमान महावीर यांनी अहिंसेचे दर्शन दिले. तर आधुनिक काळात महात्मा गांधीने अंहिसेचे दर्शन दिले, आणि त्यांनी सांगितले की, अहिंसा परमोधर्म. सोबत युगधर्मही आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर आदर्शवादी तत्त्व चिंतकांनी आदर्श जागतिक व्यवस्थेचे स्वप्न रंगविले. त्यासाठी जागतिक शांततेची आवश्यकता आहे. या जागतिक शांततेसाठी महात्मा गांधीजींच्या अहिंसावादी तत्त्वाचीच आवश्यकता आहे. आजही आपल्या देशासमोर मुलभूत समस्या सोडविण्यासाठी व नवसमाज निर्मितीसाठी अहिंसा या मार्गाशिवाय दुसरा पर्याय आजतरी उपलब्ध नाही. केवळ भारतालाच नव्हे तर जगालाही त्याशिवाय तरोणोपाय नाही. रक्तपात, हिंसा, दहशतवाद, इत्यादी समस्यांपासून मुक्त व्हायचे असेल तर, गांधीजींच्या या विचारांचा वास्तविकपणे स्वीकार केला पाहिजे या सर्व विश्लेषणातून गांधी विचारांची प्रस्तूतता दिसून येते. महात्मा गांधीजींच्या अहिंसात्मक सत्याग्रहामुळेच भारताला स्वातंत्र्य तर मिळालेच पण जगातील कांही ठळक व महत्वपूर्ण व्यक्तिवरही त्यांचा प्रभाव पडला. उदा. नेल्सन मंडेलांच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेत वंशवादाचा अस्त, बर्लिनची भिंत पाडणे, मार्टिन ल्यूथर किंग यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकेत नागरी हक्कांच्या चळवळीला मिळालेले यश, अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी बराक ओबामा यांना निवडणूकीत मिळालेले यश, व कोराझोन ॲक्विनो यांच्या नेतृत्वाची फिलिफिनमध्ये घडल्या गेलेल्या अहिंसेच्या चळवळीमुळे मार्कोस राजवटीचा झालेला अंत, गांधीजींनी दाखवून दिले, की, हिंसेपोटी फक्त हिसांच जन्मते आणि फक्त अहिंसेतच हृदय परिवर्तन घडविण्याची व सकारात्मक परिणामांची शक्ती असते. एवढी मोठी शक्ती अहिंसेत असते. त्यांच्या अंहिसात्मक विचार आणि कृतीने जगातील अनेक विभूतीला प्रभावीत केले.

१९४६ – ४७ च्या दरम्यान गांधीजीनी पश्चिम बंगालमधल्या नौखालीत जायचे ठरविले. तिथे त्यांनी शांततेची चळवळ उभारायला सुरुवात केली. तिचे यश पाहून त्यावेळचे व्हाइसरॉय लॉर्ड माऊटबॅटन यानी असे म्हटले होते कि, माझ्या पन्नास हजार जवानांच्या सैन्याला जे यश मिळविता आले नाही, ते या एकट्या शिलेदारानं त्याच्या अहिंसेच्या शांततामय मार्गाने लढा देत मिळवलं आहे. या विधानावरून गांधीजीच्या अंहिसात्मक तत्त्वाची ताकत किती मोठी असेल, याचा अंदाज लावणेही कठीण आहे.

आज म. गांधीजी जिवंत नसले तरी, त्यांचे शांततेबद्दलचे तत्त्वज्ञान, सर्वांविषयीचा आदरभाव व अहिंसेमुळे ते आजच्या द्वेष, शत्रूत्व व गैरसमजुतीमुळे पछाडलेल्या जगात कधी नव्हे इतके समर्पक ठरतात. देशामध्ये छोट्या मोठ्या लढाया चालू असतात. अशी युद्धे, अण्वस्त्रे किंवा हॉयड्रोजन बॉम्बमुळे जग वाचणार नाही, त्यासाठी फक्त गांधीजीचे अहिंसात्मक तत्त्वज्ञानच उपयोगी पडू शकते.

## दलाई लामा :

दलाई लामा हे तिबेटियनाचे एक सर्वाधिक प्रातिष्ठीत व सर्वमान्य धर्मगुरू आहेत. चीन सरकारने दलाई लामांना निर्वासित घोषित केले, त्यावेळी भारताने त्यांना आश्रय दिला. दलाई लामानेही

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

गांधीजींच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञनाचा स्वीकार करून या तत्त्वाचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. तिबेटला चीनच्या कब्जातून मुक्त करण्यासाठी अहिंसेच्या मार्गानेच लढा दिला. दलाई लामाने या तत्त्वाचा अवलंब आजपर्यंत केला. त्यांना १९८९ मध्ये नोबेल शांती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना आजही विश्वास आहे की, शस्त्रास्त्र शिवाय आपण ही लढाई जिंकू शकतो. असा विश्वास दलाई लामांना महात्मा गांधींच्या विचारातून आल्याचे स्पष्ट होते.

## नेल्सन मंडेला :

नेल्सन मंडेला निग्रोंचे नेते होते. ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वंश व वर्णभेदाच्या विरोधात अहिंसात्मक मार्गानेच संघर्ष केला. १९४४ च्या कालखंडात दक्षिण आफ्रिकेत निग्रोंवर मोठ्या प्रमाणात अन्याय अत्याचार झाला. नेल्सन मंडेलांनी महात्मा गांधीच्या मार्गावर जाऊन हिंसेचा प्रतिकार अहिंसेने केला. त्यांच्यावर कारवाई करत सरकारने त्यांना तब्बल २५ वर्षे तुरुंगात टाकले, त्यानंतर १९९० मध्ये ते तुरुंगातून बाहेर आले आणि १९९४ च्या सार्वजनिक निवडणूकीत त्यांच्या पक्षाला अभूतपूर्व यश आले आणि परिणामी ते दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रपती बनले. राष्ट्रपती बनल्यानंतर त्यांनी स्वतरूवर झालेल्या अन्याय विसरला, त्यांच्या मनात गौरवर्णीय यांच्या विषयी शत्रूत्वाची भावना निर्माण झाली नाही. त्यांच्या मनात द्वेष निर्माण होवू शकला नाही. कारण द्वेष, मत्सर, हिंसक अशा वृत्तीला त्यांच्या मनात थारा नव्हता, हा परिणाम महात्मा गांधींच्या विचाराचाच होता.

## विनोबा भावे :

विनोबा भावे हे म. गांधीजींचे शिष्य होते. त्यांची १९१६ ला प्रथम म. गांधीजीशी भेट झाली आणि तेव्हा पासून त्यांच्या हत्येपर्यंत ते त्यांच्याच सहवासात व कार्यात सक्रिय राहिल्याने त्यांचा प्रचंड प्रभाव त्यांच्या जीवनावर व कार्यावर झाला. याच प्रभावाखाली त्यानी सर्वोदय हे आपले नवे ध्येय ठरविले, गरिबीचे उच्चाटन, ग्रामीण विकास, हरिजन कल्याण आणि अहिंसक मार्गाने सामाजिक परिवर्तन या बद्दलचा महात्मा गांधीजीचा आग्रह लक्षात घेऊन त्या दृष्टिने प्रयत्न करण्यासाठी त्यांनी सन १९५१ मध्ये आंध्रपदेशातील तेलंगन जिल्ह्याची निवड केली. त्यांनी कांही महत्त्वपूर्ण कार्यक्रम हाती घेतले. उदा. भूदान व ग्रामदान या कार्यक्रमाच्या माध्यमातून समता निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला, व या प्रयत्नाला त्यांना बहुतांशी यशही आले. भूमीहिनांना जमिन देण्यासाठी त्यांनी भूदान चळवळ'' उभी केली. त्यांनी महात्मा गांधींजीच्या तत्त्वाच्या आधारेच प्रयत्न केले. त्या प्रयत्नाला त्यांना अपेक्षेपेक्षाही जास्त यश मिळाले. अवध्या ५१ दिवसात भूदान चळवळीच्या माध्यमातून १२,२०१ एकर जमीन मिळाली, १९५२ पर्यंत साधारणपणे देशाच्या वेगवेगळ्या प्रांतातून ३० लाख एकराहून जास्त जमीन

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

मिळाली, ही फार मोठी व प्रभावी कामगिरी मानली जाते. भूदान चळवळीद्वारे भारतीय समाजात अहिंसेच्या मार्गाने परिवर्तन आणता येईल अशी अपेक्षा विनोबांना होती. त्यांच्या मते मालकी हक्क आणि हव्यास, ही गरिबी व शोषणाची मूळ कारणे आहेत. त्यामुळे या भावनाच मनातून काढल्या तर समाजातील असमानता, शोषण नाहीसे करता येईल. या त्यांच्या सर्व विचारांच्या व कार्याच्या पाठीमागे गांधी विचाराचीच प्रेरणा होती.

अशा प्रकारे 'गांधीजींची अहिंसा' ही जगाला दिलेली देणगी मानली जाते. ही सापेक्ष अहिंसा आहे ज्यात सर्व समस्यांचे समाधान, परिस्थितीनुरुप केले जाऊ शकते. गांधीजींच्या पश्चात भारतातही अनेक विद्वांनानी या नीतिचा अवलंब केला. उदा. पंडित जवाहरलाल नेहरूंनी पंचशील सिध्दांत, विनोबा भावे यांचे भूदान. ग्रामदान, जयप्रकाश नारायणचे समग्रक्रांती, अण्णा हजारे भ्रष्टाचार मूक्त शासन, मेघा पाटकर नर्मदाबचाव अंदोलन, आदिंनी महात्मा गांधींजींच्या सिद्धांताचे प्रतिपादन करून बंधूभाव आणि नैतिकता व सहिष्णूता असा अहिंसापूर्ण संदेश दिला.

## निष्कर्ष :

वर्तमान आणि भविष्यातही शांततेची स्थापना करण्यासाठी एकच प्रमूख विकल्प आहे आणि तो म्हणजे अहिंसा, संपूर्ण विश्वाला शांतता सुखी समाधानाने जीवन जगायचे असल्यास अहिंसा तत्त्वाशिवाय तरणोपाय नाही, आजच्या परिस्थितीत जगात संघर्षाची विविध कारणे आहेत. त्यामूळे दिवसेंदिवस संघर्ष वाढत असल्याने शांततेला धोका निर्माण झाला आहे. उदा. जागतिक दहशतवादाची समस्या आज गंभीर बनली आहे. ही समस्या संपवायची असेल तर गांधीजींच्या अहिंसात्मक तत्त्वज्ञानाचा प्रसार, व त्याची अमंलबजावणी करणे आज आवश्यक झाले आहे. वरील विदेश व देशातील समाजसुधारक व विचारवंतावर महात्मा गांधीजींच्या अहिंसा. तत्त्वाचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. या सर्व समाजसुधारकांनी देश विदेशात आपल्या हक्कासाठी जे लढे दिले, ते अहिंसात्मक मार्गानेच, या सर्वांच्या समोर एकच आदर्श होता ते म्हणजे म. गांधीजींचे अंहिसात्मक विचार म्हणूनच गांधीजींच्या विचारांची आवश्यकता आजही आहे.

'Akshar Wangmay' UGC Approved & Peer Reviewed International Research Journal
RNI: MAHMAR 36829-2010
ISSN : 2229-4929

Rethinking Mahatma Gandhi in Present Context

February – 2020

Published by – Dr. Kiran Save, Principal,Sonopant Dandekar Arts, V.S. Apte Commerce & M.H. Mehta Science College Palghar

The Editor shall not be responsible for originally and thought expressed in the papers. The authors shall be solely held responsible for the originally and thoughts expressed in their papers.

© all rights reserved with the Editors.

UGCCARE Listed Journal Akshar Wangmay